नागपूर महानगरपालिका सभेने पारित केलेले ठराव क्र.२४४ दिनांक ०२/०७/२०१८ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५१ अन्वये निलंबीत करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक- नामपा-२०१९/प्र.क्र.०४/नवि-२६
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ०१/०८/२०१९

वाचा :- आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांचे पत्र क्र.३४६/आस्थापना, दिनांक ०९/११/२०१८

प्रस्तावना :-

नागपूर येथील स्थित ग्रेट नाग रोड येथील सि.स.नं.२ मधील प्लॉट नं.१२-अ वर उभारण्यात आलेल्या अनधिकृत बांधकामाच्या निष्काषनाच्या कार्यवाहीमध्ये, श्री.कांतीकुमार लक्ष्मीप्रसाद सोनकुसरे, उपविभागीय अभियंता, लोककर्म विभाग (सेवानिवृत्त) यांनी, गंभीर स्वरुपाचे गैरवर्तन केल्याचे आरोप त्यांचेविरुध्द झालेल्या विभागीय चौकशीमध्ये सिध्द झाल्याने, दिनांक १४/०१/२००८ च्या आदेशान्वये त्यांच्या "पुढील वार्षीक वेतनवाढ भविष्यातील वेतनवाढीवर कायम परिणाम करणारी ठरेल अशा रितीने पुढील तीन वर्षाचे कालावधीकरिता रोखण्याची शिक्षा" देण्यात आलेली होती.

याविरोधात श्री.सोनकुसरे ह्यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९ नुसार अपील दाखल करण्याची मुदत ४५ दिवस असताना, त्यांनी सुमारे १० वर्षानंतर अध्यक्ष स्थायी समिती, नागपूर मनपा यांचेकडे अपील दाखल केले. या अपिलावर नागपूर महानगरपालिकेच्या स्थायी समितीने दिनांक ०१/०३/२०१८ रोजी निर्णय दिलेला आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५६ (४) नुसार, पोटकलम (१) च्या परंतुकाच्या खंड (ड) मधील तरतुदीनुसार एक महिन्याच्या आत अपील अर्ज करण्याची तरतूद आहे आणि प्रस्तुत प्रकरणात आयुक्त, नागपूर मनपा यांनी श्री.सोनकुसरे यांना कलम ५६ (४) मध्ये नमूद शिक्षेपैकी (बडतर्फी, काढून टाकणे किंवा खालच्या पदावर आणणे) कोणतीही शिक्षा दिलेली नसून, वेतनवाढ रोखण्याची किरकोळ शिक्षा दिलेली आहे. आणि नागपूर महानगरपालिका ठराव क्र.२० दिनांक ०८/०६/१९८४ नुसार महापालिकेतील वर्ग-१ च्या पदावरील अधिकाऱ्यांना किरकोळ शिक्षा करण्याचे व वर्ग-२ ते ४ च्या पदावरील अधिकारी / कर्मचाऱ्यांना जबर व किरकोळ शिक्षा करण्याचे अधिकार आयुक्तांना बहाल करण्यात आलेले आहेत.

तथापि, अध्यक्ष, स्थायी समिती यांच्या उपरोक्त आदेशानुसार सदरचे प्रकरण महापालिका सभागृहापुढे सादर केले असता, महापालिका सभागृहाने "श्री.कांतीकुमार लक्ष्मीप्रसाद सोनकुसरे यांना तीन वेतनवाढी देण्याबाबतचा ठराव क्र.२४४ दिनांक ०२/०७/२०१८ पारित केलेला आहे.

महानगरपालिकेने पारित केलेला सदरचा ठराव, प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावाशी विसंगत असल्यामुळे व तो महानगरपालिकेच्या आर्थिक हिताचा नसल्याने, सदरचा ठराव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ४५१ नुसार विखंडीत करुन, तत्कालीन आयुक्तांचे आदेश कायम करण्याबाबत संदर्भाधीन पत्रान्वये विनंती केली आहे.

उक्त वस्तुस्थिती पहाता, महानगरपालिकेच्या प्रशासकीय शिस्तीच्या अनुषंगाने, आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांनी संदर्भाधीन पत्रान्वये, शासनाकडे पाठविलेल्या प्रस्तावावर निर्णय घेण्याची बाब शासनस्तरावर विचाराधीन होती. यास अनुसरुन, शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

शासन निर्णय :-

नागपूर महानगरपालिका सभागृहाने पारित केलेले ठराव क्र. २४४ दिनांक ०२/०७/२०१८ हा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४५१ (१) नुसार तात्पुरता निलंबित झाल्याचे मानण्यात येत आहे.

तथापि, यावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४५१(२) नुसार आदेशाच्या दिनांकापासून एक महिन्यात महापालिका तसेच आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांना अभिवेदन करण्यास संधी देण्यात येत आहे. विहीत मुदतीत अभिवेदन प्राप्त न झाल्यास, या अधिनियमातील कलम ४५१(३) नुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

०२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८०११६०२४९२१२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षंकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sanjay S Gokhale

Digitally signed by Sanjay S Gokhale
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Urban Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ab8a7eeedad158d24cf530f0d6b662808245be49a8459ed4c63961ebdc3cb961, cn=Sanjay S Gokhale
Date: 2019.08.01 16:51:13 +05'30'

(सं. श. गोखले)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.महापौर, नागपूर महानगरपालिका, नागपूर, द्वारा आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर.
२) आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर
३) सचिव (नवि-२) यांचे वि.का.अ.
४) उप सचिव (नवि-२६), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) निवडनस्ती, कार्यासन नवि-२६.